बारामती शहर विकासाचे रोल मॉडेल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

भव्य 'नमो महारोजगार मेळाव्या'सह विविध विकास कामांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

बारामती / प्रतिनिधी

नमो महारोजगार मेळाव्यातून तरुणाईला स्वत:चे आणि राज्याचे भविष्य घडविण्याची एक मोठी संधी मिळाली आहे असे सांगतानाच बारामती येथे आयोजित या मेळाव्यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे असेही यावेळी ते म्हणाले.

विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने आयोजित पुणे विभागस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्या'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी बारामतीतील विविध विकास कामांतर्गत बऱ्हाणपूर येथील पोलीस उपमुख्यालय, बारामती बस स्थानक, अपर पोलीस अधीक्षक, वाहतूक शाखा, बारामती पोलीस ठाणे तसेच पोलीस वसाहतींचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, ज्येष्ठ खासदार शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार दत्तात्रय भरणे आदी उपस्थित होते.

मेळाव्यात तरुणाईला मार्गदर्शन मिळेल आणि रोजगारही उपलब्ध होईल. यापूर्वी नागपूर, लातूर, अहमदनगर येथे मेळावे झाले असून बारामती येथे आयोजित हा मेळावा सर्व विक्रम मोडणारा असून यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे. शहराच्या विकासात शरद पवार, अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. विकासकामे करताना सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कटाक्ष असतो. आज उद्घाटन झालेल्या प्रकल्पांच्या दर्जात कुठेही तडजोड झाली नाही हे दिसून येते.

राज्यात यापूर्वी नोकरभरती बंद होती. या शासनाने ७५ हजार रोजगार देण्याचे लक्ष्य ठेवले होते. त्या तुलनेत १ लाख ६० हजार रोजगार दिले आहेत. विविध नोकर भरती सुरू असून २२ हजार पोलिसांची भरती, ३० हजारावर शिक्षकांची पदे भरण्यात येत आहेत. त्यात मराठा समाजाला आरक्षण दिलेलेही समाविष्ट आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

शासन आपल्या दारी हा देखील राज्य शासनाचा लोकाभिमुख उपक्रम असून विविध योजना, शासन निर्णय असताना तसेच लाभार्थी असतानाही शासकीय कार्यालयात जाण्याची कटकट नको म्हणून लाभ सोडून देणाऱ्या नागरिकांना लाभ देण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला. यात एकच छताखाली गरिबांना घरांचा, महिला बचत गट, शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टर, पॉवर टिलर, ड्रोन, हार्वेस्टर आदी अनेक लाभ दिले. या कार्यक्रमातून २ कोटी ६० लाख लोकांना विविध लाभ देण्यात आले.

पोलीस हा कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करत असताना सणवार, उत्सव, आंदोलने आदी कालावधीत ऊन, पाऊस वाऱ्यामध्ये रस्त्यावर उभा असतो. म्हणून त्यांच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा करत असताना त्यांना दर्जेदार सुविधाही दिल्या पाहिजेत. त्या बारामतीतील या पोलीस वसाहतीत दिल्या आहेत. राज्यातील सर्व बसस्थानके सर्व सोई सुविधायुक्त अशी सुसज्ज 'बसपोर्ट' करून प्रवाशांना सर्व सोई सुविधा देण्याचा शासनाचा प्रयत्न असून बारामतीमध्ये राज्यातील पहिले मॉडेल बसस्थानक झाले आहे.

बारामती तालुका राज्यात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी प्रयत्न करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

बारामती / प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, बारामतीच्या वैभवात भर घालणाऱ्या चार सुंदर इमारतींचे आज लोकार्पण करण्यात आले. पोलीस उप मुख्यालयाच्या इमारतीसाठी १३२ कोटी रुपये, पोलीस वसाहत साठी ७५ कोटी रुपयांचा खर्च आला. बारामतीचे नूतन बस स्थानक महाराष्ट्रातील क्रमांक एकचे बस स्थानक आहे. खूप चांगल्या दर्जाची कामे झाली आहेत. विविध विकास कामांसाठी निधीची देखील कमतरता कमी पडू दिली जाणार नाही.

पोलीस विभागाला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आज ३९ वाहनांचा लोकार्पण सोहळा पार पडला त्यात १४ महिला वाहन चालक आहेत. महिलांना देखील संधी प्राप्त करून दिली जात आहे. महाराष्ट्रात बारामती हा क्रमांक एकचा तालुका येण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्याने जर्मनीबरोबर एक करार केला असून त्यांना ५ लाख कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यासाठी मनुष्यबळ कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आजच्या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून अधिकाधिक उमेदवारांना रोजगार मिळवा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कृषीमूल शिक्षण संस्था आयटीआय तसेच मालेगाव येथील शासकीय आयटीआय येथे विविध १५ ते ३० दिवसांचे कौशल्य विकास अभ्यासक्रम राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांना त्यातून रोजगार मिळू शकणार आहेत, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

श्री. लोढा म्हणाले, महाराष्ट्रात प्रथम नागपूर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते. त्या रोजगार मेळाव्यात चांगला प्रतिसाद मिळाला. बारामती येथील रोजगार मेळाव्यात उद्योजकांनी ५५ हजार ५५७ रिक्तपदे अधिसूचित केली आहेत. याठिकाणी २५४ उद्योजकांनी सहभाग घेतला असून ३८ हजार ७४४ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. याव्यतिरिक्त ऑनलाईन नोंदणी देखील मोठ्या प्रमाणात झाली आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात कौशल्य विभागासाठी भरीव तरतूद केली आहे. त्याच्या माध्यमातून राज्यातील १ हजार महाविद्यालयात नोकरीच्या दृष्टीने ३ महिन्याचे कौशल्य विकासाचे कोर्स सुरू करण्यात येतील.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होणे गरजेचे !

शिक्रापूर / प्रतिनिधी

केंदूर सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठे वैज्ञानिक बनतील, यासाठी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन करत जिंतूर - सेलू विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मेघना साकोरे (बोर्डीकर) यांनी विद्यालयातील विविध उपक्रमांचे कौतुक केले आहे.

केंदूर ता. शिरूर येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे डॉ. सी. व्ही. रमन यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला यावेळी आमदार मेघना साकोरे (बोर्डीकर), पोलीस आयुक्त दिपक सोकोरे, आस्थापना आयुक्त पुणे राहुल साकोरे, संस्थेचे विद्या समिती अध्यक्ष श्रीराम साळुंखे, अर्थ सहसचिव सिताराम गवळी, प्राचार्य अनिल साकोरे, वाशी मार्केटचे संचालक सुनिल चौधरी, सर्जेराव डुकरे यांसह आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे महत्व कळावे व आवड निर्माण व्हावी तसेच विदयार्थ्यांतून शास्त्रज्ञ घडावेत हा हेतू असल्याचे प्राचार्य अनिल साकोरे यांनी सांगीतले, तर विद्यार्थ्यांनी उपलब्ध सुविधा, साहित्याचा वापर करून चांगला अभ्यास करुन आपल्या गाव व विद्यालयाचे नाव उज्वल होईल असे काम करण्याचे आवाहन संस्थेचे विद्या समिती अध्यक्ष श्रीराम साळुंखे यांनी केले, तसेच नवी मुंबई चे अतिरिक्त पोलिस आयुक्त दिपक साकोरे यांनी देखील मार्गदर्शन केले, दरम्यान राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने विद्यालयात स्टेम लॅब अंतर्गत विज्ञान विषयाचे विविध मॉडेल विद्यार्थ्यांनी बनवून मांडले असता उपस्थितांनी त्याचे कौतुक केले. आयोजित राष्ट्रीय विज्ञान दिनाचे नियोजन व मार्गदर्शन विज्ञान शिक्षक प्रशांत गांजरे, प्रशांत गलांडे, विक्रांत बुटाले, नंदुलाल बहिरम, सारिका पाटील यांनी केले. तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश गावडे यांनी केले तर प्रास्ताविक प्राचार्य अनिल साकोरे यांनी केले.

थोडक्यात

आज पुन्हा एकदा वारजे टेकडीवर आग

पुणे : आज पुन्हा एकदा वारजे टेकडीला आग लागली. वारजे अग्निशमन केंद्रमधील सेवकांनी बंबद्वारे आग विझवण्याचे प्रयत्न केले. परंतु, या आगीबाबत वनविभाग अधिकारी यांना गांभीर्य नाही. आठ दिवसात चार वेळा आग लागून सुद्धा एकदाही एकही अधिकारी वारजे टेकडीवर फिरकला नाही. वारजेतील डुक्कर खिंड ते तिरुपतीनगर दरम्यान असलेल्या(झींपश) छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव समोरील टेकडीवर आग लागून सर्व झाडें जळून खाक झाली. सलग ८ दिवसापासून आग लागल्याची घटना घडत आहे. त्या पार्श्वभूमीवर वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे. मात्र, या अधिकाऱ्यांना त्याचे काहीही गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. सोसायटीचे पदाधिकारी, सभासद, शाळांचे विद्यार्थी, सामाजिक संस्था, कंपनीचे कर्मचारी, मंडळाचे कार्यकर्ते, बांधकाम व्यावसायिक, शासकीय सेवक, इत्यादीनी या टेकडीवर वृक्षरोपण केलेले आहे. वारजे अग्निशमन केंद्रच्या सेवकांनी प्रयत्न करून आग विझविण्याचा प्रयत्न केला आहे. या टेकडीवर मागील ८ - १० वर्षांपासून वृक्ष लावण्यात आली आहेत. ही वृक्ष जगविण्यासाठी पाण्याची कमतरता आहे.

सलग ८ दिवस झाले आग लागते आहे. त्याकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पुणे महापालिकेच्या शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबा धुमाळ यांनी केला आहे. वनसंरक्षन अधिकारी लक्ष देत नाही. या टेकडीवर सुरक्षा रक्षक तैनात नाही.

त्यामुळे या टेकडीची सुरक्षा धोक्यात आली आहे, असेही धुमाळ यांनी सांगितले. नागरिकांनी धुमाळ यांना फोन करून या प्रकारची माहिती दिली असता, त्वरित अग्निशमन केंद्रातील सेवकांना बोलावून घेतले. भविष्यात अशा प्रकारच्या आगीच्या घटना घडू नये, यासाठी वनविभागाने सतर्क राहण्याचे आवाहन धुमाळ यांनी केले आहे.

विद्याधाम प्रशालाचे यशवंतराव चव्हाण आंतरशालेय नाट्य स्पर्धेत यश

शिरूर / प्रतिनिधी

जिल्हा परिषद पुणे व ' डायट ' आयोजित यशवंतराव चव्हाण आंतरशालेय नाट्यस्पर्धा आणि पु .ल .देशपांडे करंडक २०२३ -२४ मध्ये विद्याधाम प्रशाला शिरूरचे घवघवीत यश मिळाल्याची माहिती प्राचार्य संजय शेळके यांनी दिली. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीनही नाटकांनी तालुका स्तरावर प्रथम क्रमांक मिळविला होता . तसेच जिल्हा स्तरावर तीनही नाटकांचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह,गंज पेठ,पुणे येथे संपन्न झाला.हा सन्मान सोहळा पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण यांच्या शुभहस्ते झाला. त्या प्रसंगी प्रसिद्ध अभिनेत्री, दिग्दर्शिका प्रतिमा जोशी, डायट च्या प्राचार्या डॉ . नेहा बेलसरे उपस्थित होत्या.मराठी नाटीका - बीन कपड्यांचा राजा यामध्ये उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. हिंदी नाटीका-अंधेर नगरी चौपट राजा यामध्ये द्वितीय क्रमांक मिळाला. तसेच इंग्रजी नाटीका - श्रळींशप ीं ेंहश ींपींरळप यामध्ये द्वितीय क्रमांक मिळाला.उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून विवेक घोडेराव, संदीप यादव,वैशाली ढवळे, संजय बनकर, मच्छिंद्र बनकर,पूनम पवार, यमुना रायकर, संदीप तानवडे या अध्यापकांनी काम

केले.तसेच उत्कृष्ट अभिनय मयूर झरेकर,अथर्व पठारे. वैष्णवी पोटे,नित्या तळप,ओम पाटील यांनी केले. त्याबद्दल त्यांना उत्कृष्ट दिग्दर्शक व उत्कृष्ट अभिनय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यशस्वी विद्यार्थी व दिग्दर्शक यांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शालेय समितीचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, राजेंद्र दुगड, मोहनलाल गादिया तसेच प्रशालेचे प्राचार्य संजय शेळके, पर्यवेक्षक बाबुराव कोकाटे, गुरूदत्त पाचर्णे, शिवाजी पर्बत यांनी अभिनंदन व कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिपक गुजर, सुत्रसंचलन मच्छिंद्र बनकर, आभार प्रदर्शन वैशाली ढवळे यांनी केले.

महाराष्ट्र बॅकेच्या वसुली पथकाच्या एजंटचा धारदार शस्त्राने केली हत्या!

पाटस / प्रतिनिधी

जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर दौंड तालुक्यातील वासुंदे हद्दीत महाराष्ट्र बँकेच्या वसुली पथकाच्या एजंट चा अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने भोकसुन हत्या केल्याची घटना घडली.

या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींच्या विरोधात कुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली. प्रविण मळेकर (वय ३०, रा. गुरुवार पेठ, आधार कॉम्प्लेक्स फ्लॅट नंबर ३०१, युको बँकेचे समोर कस्तुरी चौक, पुणे) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव असून ही घटना शनिवारी (दि. २)रात्री ७.४५ वाजण्याच्या आसपास संत तुकाराम महाराज पालखी महामार्गावर वासुंदे हद्दीतील इंडियन ऑईल पंपा समोर घडली घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, प्रवीण मळेकर हे शनिवारी सकाळी ९.१५ वाजण्याच्या सुमारास हिरो होन्डा पँशन मोटारसायकल (नंबर चक १३ एझ ९३३६) यावरुन बँक ऑफ महाराष्ट्र शाखा बारामती या बँकेचे रिकव्हरीचे नोटीस वाटप करण्यासाठी राहत्या घरातुन बारामती परिसरात गेले होते. ते नोटीस बजावुन घरी जात असताना रात्री पावणे आठ वाजण्याच्या आसपास कोणीतरी अज्ञात व्यक्तींनी धारदार हत्याराने हल्ला करून कोणत्या तरी अज्ञात कारणाने त्यांच्यावर वार करून भोकसुन त्यांचा खून केला. दरम्यान , प्रवीण मळेकर यांना उपचारासाठी लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले. याप्रकरणी मृत प्रवीण मळेकर यांचा मुलगा ऋषिकेश यांना दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने अज्ञात व्यक्तींच्या विरोधात दोन पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनेचा अधिक तपास दौंड पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम राठोड हे करीत आहेत. दरम्यान , या गुन्ह्याचा सखोल तपास सुरू असून त्यासाठी एक पोलीस निरीक्षक,तीन पोलीस उपनिरीक्षक आणि १५ पोलीस कर्मचारी असे पथक तपासासाठी तैनात करण्यात आले आहे. लवकरच या गुन्हयाचा छडा लावून आरोपी जेरबंद करण्यात येईल. अशी माहिती पोलीस निरीक्षक यादव यांनी दिली.

FORM A
PUBLIC ANNOUNCEMENT
(Under Regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)
FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF
DALANE INDUSTRIES PRIVATE LIMITED
RELEVANT PARTICULARS

01.	Name of corporate debtor	DALANE INDUSTRIES PRIVATE LIMITED
02.	Date of incorporation of corporate debtor	18/07/2011
03.	Authority under which corporate debtor is incorporated / registered	ROC - Pune
04.	Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor	U28113PN2011PTC140180
05.	Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor	Plot No.194, Sector No.07 , Pradhikaran, Bhosari, Pune, Maharashtra -411026
06.	Insolvency commencement date in respect of corporate debtor	26/02/2024 (communication about appointment received on 29/02/2024)
07.	Estimated date of closure of insolvency resolution process	24/08/2024(180 days from the Insolvency Commencement date which is 26th February'2024)
08.	Name and registration number of the insolvency professional acting as interim resolution professional	VASUDEV GANESH NAYAK UDUPI IBBI/IPA-001/IP-P00019/ 2016-17/10043 AFA valid till 31/12/2024
09.	Address and e-mail of the interim resolution professional, as registered with the Board	303/305, Rajamata CHS Ltd, Near RTO, Four Bungalows, Andheri – West, Mumbai – 400053 uvnayak2004@yahoo.co.in
10.	Address and e-mail to be used for correspondence with the interim resolution professional	303/305, Rajamata CHS Ltd, Near RTO, Four Bungalows, Andheri – West, Mumbai - 400053 cirp.dalane@gmail.com
11.	Last date for submission of claims	14/03/2024 (14 days from the date of receipt of the order ie 29th February'2024 is given)
12.	Classes of creditors, if any, under clause (b) of sub-section (6A) of section 21, ascertained by the interim resolution professional	Name the class (es) – NA.
13.	Names of Insolvency Professionals identified to act as Authorised Representative of creditors in a class (Three names for each class)	NA
14.	(a) Relevant Forms and (b) Details of authorized representatives are available at:	Web link **https://ibbi.gov.in/downloadform.html** Not applicable

Notice is hereby given that the National Company Law Tribunal Mumbai Bench has ordered the commencement of a corporate insolvency resolution process of the **DALANE INDUSTRIES PRIVATE LIMITED** on 26/02/2024 . The order copy was received on 29/02/2024.
The creditors of **DALANE INDUSTRIES PRIVATE LIMITED** are hereby called upon to submit their claims with proof on or before **14/03/2024** to the interim resolution professional at the address mentioned against entry No. 10.
The financial creditors shall submit their claims with proof by **electronic means** only. All other creditors may submit the claims with proof in person, by post or by electronic means.
The submission of proof of claims should be made in accordance with Chapter IV of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016. The proof of claims is to be submitted by way of the specified forms along with documentary proof in support of their claims:
Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.
Kindly mention contact details in the claim form so that any query regarding claim can be resolved immediately.

CA Vasudev Ganesh Nayak Udupi
Interim Resolution Professional of -
DALANE INDUSTRIES PRIVATE LIMITED
IBBI/IPA-001/IP-P00019/2016-17/10043 AFA valid till 31/12/2024
Date:02/03/2024
Place: Mumbai

श्री विघ्नहर तर्फे ऊस तोड कर्मचाऱ्यांकरीता कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

जुन्नर / प्रतिनिधी

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना, जिल्हा विधी सेवा प्राधीकरण, पुणे व प्रादेशिक सहसंचालक साखर आयुक्तालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कारखाना कार्यस्थळावर कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधीकरण, पुणेच्या सचिव सोनल पाटील, प्रादेशिक सहसंचालक निलिमा गायकवाड तसेच विघ्नहरचे कार्यकारी संचालक भास्कर घुले, सेक्रेटरी अरुण थोरवे, मुख्य शेतकी अधिकारी सचिन पाटील, शेतकी अधिकारी संदीप जाधव, संदीप मोरडे, जयेश ढोमसे, एस.आर.जाधव आदिंसह ऊस तोडणी मुकादम, मजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना कार्यकारी संचालक भास्कर घुले म्हणाले की, विघ्नहरकडे काही ऊस तोडणी मजूर २० ते २५ वर्षापासून काम करत आहेत. कारखाना कार्यस्थळावर कारखाना त्यांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयी सुविधा देत आहे. कोरोना काळात सर्व व्यवहार ठप्प असताना विघ्नहरने तोडणी मजूरांसाठी किराणा व जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा केलेला आहे. शासन ऊस तोडणी मजूरांसाठी विविध प्रकारच्या योजना राबवित आहे. तरी सर्व मजूरांनी कामगार कार्ड म्हणजेच ओळखपत्र मिळण्यासाठी असणारा अर्ज भरुन द्यावा, असे आवाहन घुले यांनी केले.

शासकिय अधिकारी सोनल पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जिल्हा विधी सेवा प्राधीकरण हे पिडीतांना न्याय देण्याकरीता महत्वाचा दुवा म्हणून काम करत आहे. ऊस तोडणी कामगारांसाठी कामगार कायदे नाहीत, म्हणून सर्वोच्च न्यायालयाने स्वतः लक्ष घालून एक स्वतंत्र सेल विधी सेवा प्राधीकरण सुरु केलेले आहे. शासनाने गोपिनाथ मुंढे महामंडळ स्थापन केले असून त्यामार्फत ऊस तोडणी मजूरांच्या मुलांकरीता मोफत वसतीगृहे चालविली जात आहेत. प्रत्येक मयत ऊस तोडणी मजूराला रुपये ५ लाखांची मदत दिली जाते. त्यासाठी प्रत्येकाजवळ ऊस तोड मजूर कार्ड आवश्यक असल्याचे पाटील यांनी सांगितले.

निलिमा गायकवाड म्हणाल्या की, याबाबत हायकोर्टाने स्वतः याचिका दाखल करुन घेतली असून सर्वांनी ऊस तोड कामगार ओळखपत्र काढून घेणे आवश्यक आहे. विघ्नहर कारखान्यातर्फे लेबरसाठी विविध सेवा-सुविधा पुरविल्या जातात. आरोग्य शिबीरही घेतले जाते. जनावरांचे लसीकरण केले जाते.

यावेळी ऊस तोडणी कंत्राटदार बाळासाहेब थोरात म्हणाले की, विघ्नहर कारखाना मजूरांसाठी आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरवित आहे. ऊस तोड लेबरची विघ्नहर कारखान्याकडून योग्य ती काळजी घेतली जाते. त्यामुळे काही तोडणी मजूर गेल्या पंधरा ते विस वर्षापासून करार करुन सातत्याने विघ्नहर कारखान्याकडे येत असल्याचे त्यांनी सांगीतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन शेतकी अधिकारी संदीप जाधव आभार मुख्य शेतकी अधिकारी सचिन पाटील यांनी मानले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. * व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com